# :: प्रेस नोट ::

दि. ०८/०२/२०२१

आरोपी लोकसेवक - श्री.अजिनाथ मधुकर बांदल, वय ४१ वर्ष, पद अव्वल कारकुन, तहसील कार्यालय आष्टी, ता. आष्टी वर्ग-३ रा.मुर्शदपुर ता.आष्टी जि.बीड.यांना ५०००/- ( पाच हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड. |
| पोलीस स्टेशन | पोलीस ठाणे आष्टी, ता.आष्टी,जि. बीड |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री.अजिनाथ मधुकर बांदल, वय ४१ वर्ष, पद अव्वल कारकुन , तहसील कार्यालय आष्टी, ता. आष्टी वर्ग-३ रा.मुर्शदपुर ता.आष्टी, मुळ राहणार कान्होबाची वाडी ता.शिरुर जि.बीड. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०००/- ( पाच हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांनी आज दिनांक ०८/०२/२०२१ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे स्वस्त धान्य दुकानाचे परवाना नुतनीकरण करण्यासाठी अव्वल कारकुन,तहसील कार्यालय,आष्टी श्री.अजिनाथ मधुकर बांदल हे लाचेची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक ०८/०२/२०२१ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.अजिनाथ मधुकर बांदल,अव्वल कारकुन, तहसील कार्यालय आष्टी,ता. आष्टी यांनी पंचा समक्ष ५००० रुपये लाच रक्कम मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.<br>सदर लाचमागणी पडताळणीवरुन आलोसे श्री.अजिनाथ मधुकर बांदल, यांचे विरुध्द तहसील कार्यालय आष्टी येथे सापळा लावला असता आलोसे श्री.बांदल यांना पंचासमक्ष रु.५००० लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले.<br>त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे आष्टी येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.डॉ.राहुल खाडे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा.डॉ. अनिता जमादार, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,यांचे मार्गदर्शनाखाली श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोलीस उप-अधीक्षक,बीड व पोलीस अमंलदार,अमोल बागलाने,विजयकुमार बरकडे,सखाराम घोलप,चालक अमंलदार मोरे,ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड |
| संकेतस्थळ | :-**acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ई-मेल | :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**<br>2) **dyspacbbeed@gmail.com** |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- **acbmaharashtra.net** |
| टोल फ्रि कमांक | :- १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :-०२४४२-२२२६४९ |
| व्हॉटस अप क. | :-९९३०९९७७०० |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ८८८८८०७२९९ |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ९८८११००८१२३ |
| पोलीस उप अधीक्षक,लप्रवि,बीड | :- ९१५८६३२६२६ |

स्वाक्षरीत

(बाळकृष्ण हनपुडे पाटील)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.